## योजना

**योजनेचे नावः-** 13 **वने** 7% **वन महसुल अनुदान सन** 2024-25 **या वित्तीय वर्षा अंतर्गत शेतकऱ्यांना शेतीचे उत्पादनाकरीता** 75% **अनुदानावर ताडपत्री चे वाटप करणे**

**तरतुद :-** रुपये 5,00,000/- (अक्षरी- रुपये पाच लक्ष फक्त)

गडचिरोली जिल्हा हा आदिवासी व दुर्गम असुन जिल्हयात प्रामुख्याने भाताचे पिक घेतले जाते. भाताचे पिक हे बहुतांश पावसाच्या पाण्यावर घेतले जाते. मागील 10 ते 15 वर्षाच्या भात पिकाचे उत्पन्नाबाबत आढावा घेतला असता असे दिसून येते की, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या धानाचे मोठया प्रमाणात नुकसान होते.साठवणुकीच्या ठिकाणी ओलावा असल्याने धानाची प्रतवारी टिकुन राहत नाही त्यामुळे योग्य बाजार भाव मिळत नाही. व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसानहोते. ताडपत्रीचा वापर करुन धान व इतर पिकांचे शेतमालाचा उत्तम दर्जा राखने व शेतकऱ्यांना आर्थिक फायदा मिळवून देण्याकरीता तसेच अनु.जाती ,अनु.जमाती,अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पादनात वाढ करणे हा या योजनेचा मुख्य उददेश आहे. गडचिरोली जिल्हयातील शेतकऱ्यांची मागणी ज्याप्रमाणे उपलब्ध होईल त्या अन्वये शेतकऱ्यांना ताडपत्रीचा लाभ देण्यात येईल.

### योजना राबविण्याची कार्यपध्दती:-

**संपुर्ण गडचिरोली जिल्हयातील शेतकऱ्यांना खालील अटी व शर्तीचे अधिन राहून योजनेचा लाभ देता येईल.**

1) वरील योजनेचा लाभ जंगल व्याप्त क्षेत्रातील गावातील अल्प,अत्यल्प,भुधारक ,अनुसुची जाती,जमाती ,विमुक्त व भटक्या जाती,जमाती या शेतकऱ्यांना देण्यात येईल.
2) सदर योजने अंतर्गत ताडपत्री खरेदीवर 75% अनुदान देण्यात येईल.जास्तीत जास्त 3500/-चे मर्यादेत प्रती लाभार्थी जे कमी असेल ते अनुदान देय राहिल.
3) सदर योजनेचा लाभ पात्र लाभार्थी व गरजु शेतकऱ्यांना देण्यात येईल व लाभार्थ्यांची निवड पंचायत समिती स्तरावर करण्यात येईल.
4) अर्ज लक्षांकापेक्षा जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्यास लॉटरी पध्दतीने निवड करण्यात येईल. लॉटरीव्दारे निवड करीता सहा. गट विकास अधिकारी , कृषि अधिकारी , विस्तार अधिकारी (कृषि) यांचे समितीने लाभार्थ्यांची लॉटरी पध्दतीने निवड करावी.
5) पात्र शेतकऱ्याने (पं.स. स्तरावर अनुमती मिळालेल्या ) संपूर्ण रक्कम भरुन ताडपत्री खरेदी करावी व दुकानदाराकडून GST सह खरेदीची पावती ताडपत्रीच्या फोटोसह पंचायत समितीच्या कृषि अधिकारी /विस्तार अधिकारी (कृषि) यांच्याकडे सादर करावे. (1) ताडपत्री किमान 5X5 ते 8X8 दरम्यान मिटर आकाराची असणे गरजेचे आहे. (2) ताडपत्री HDPE/LDPE ची असावी . (3) ताडपत्रीची जाडी किमान 100 ते 200 जी.एस.एम./ चौ.मिटर असावी.(4) ताडपत्री ISI मार्कची असावी.
6) सदर योजना संपुर्ण जिल्हयाकरीता सन 2024-25 या वित्तीय वर्षा करीता राबविण्यात येईल.
7) या योजनेची अमंलबजावणी DBT तत्वावर राबविण्यात येईल.
8) पंचायत समिती स्तरावर व्यापक प्रसिध्दी करुन लाभार्थ्यांची निवड करुन योजना कार्यान्वित करण्यात येईल. ग्रामपंचायतला ग्रामसभेमार्फत माहिती दयावी.
9) GST वगळुन अनुदान देय राहील.

सदर योजनेवर होणारा खर्च 13 वने 7 % वन महसुल अनुदान सन 2024-25 या वित्तीय वर्षा अंतर्गत (101-21 ) शेतकऱ्यांना शेतीचे उत्पादनाकरीता 75% अनुदानावर लाभ देणे या लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा.

**कृषि विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद,गडचिरोली**

| | दुरध्वनी क्रमांक (07132-222312) | जिल्हा परिषद,गडचिरोली कृषि विभाग Email:-adozp_gad@yahoo.co.in |
|---|---|---|
| जा.क्रमांक/जिपग/कृवि/13 वने/ 1767/2024 | | दिनांक 12/ 09 /2024 |

प्रति

1) गट विकास अधिकारी
पंचायत समिती---------------------------------(सर्व)
2) कृषि अधिकारी
पंचायत समिती ----------------------------------(सर्व)

**विषय :- 13 वने 7% वन महसुल अनुदान सन 2024-2025 अंतर्गत शेतक-यांना शेतीचे उत्पन्नाकरीता ताडपत्री खरेदी वर 75% अनुदान देणेकरीता लाभार्थ्यांची यादी अंतिम मान्यतेस्तव आर्थिक लक्षांक देणेबाबत.**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र/जिपग/कृवि/स्था.1/1659/2024 दिनांक 02/09/2024.**

वरिल विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येत आहे की विषयांकीत योजनेअंतर्गत योजनेत पात्र असलेल्या शेतक-यांना ताडपत्री खरेदीवर 75 % अनुदान देण्याचे प्रस्तावीत आहे. त्याकरीता योजनेची व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच पंचायत समिती स्तरावर पात्र शेतक-यांचे अर्ज मागविण्यात यावेत. अनुदानाच्या प्रमाणात अर्ज मंजुर करावेत. तसेच जास्तीचे अर्ज प्राप्त झाल्यास लॉटरी पध्दतीने निवड करण्यात यावी. अनुदान लक्षांकाच्या मर्यादेत अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करुन अंतिम मान्यतेस्तव **दिनांक** 30.09.2024 पर्यंत या कार्यालयास सादर करावी. अनुदानाचे **लक्षांक** खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | पंचायत समिती, **गडचिरोली** | रुपये - 42000/- |
| 2 | पंचायत समिती, **आरमोरी** | रुपये - 42000/- |
| 3 | पंचायत समिती, **वडसा** | रुपये - 40000/- |
| 4 | पंचायत समिती,**कुरखेडा** | रुपये - 42000/- |
| 5 | पंचायत समिती,**कोरची** | रुपये - 43000/- |
| 6 | पचायत समिती, **धानोरा** | रुपये - 42000/- |
| 7 | पंचायत समिती, **चामोर्शी** | रुपये - 42000/- |
| 8 | पंचायत समिती, **मुलचेरा** | रुपये - 42000/- |
| 9 | पंचायत समिती, **एटापल्ली** | रुपये - 42000/- |
| 10 | पंचायत समिती, **अहेरी** | रुपये - 42000/- |
| 11 | पंचायत समिती, **भामरागड** | रुपये - 41000/- |
| 12 | पंचायत समिती, **सिरोंचा** | रुपये - 40000/- |

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद , गडचिरोली

**प्रतिलीपी :-**

1) मा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली. यांना माहितीस सविनय सादर.
2) मा.अपर मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद गडचिरोली. यांना माहितीस सविनय साद

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद , गडचिरोली

O/C

# अर्ज

प्रति,

मा. गट विकास अधिकारी

पंचायत समिती-------------------

**विषय :-** ताडपत्री 75% अनुदानावर घेण्यास परवानगी मिळणेबाबत.

1. शेतकाऱ्याचे संपूर्ण नाव :- श्री--------------------
2. जातीचे वर्गवारी (SC/ST/OBC/VJ)
3. जमिनीचे क्षेत्रफळ :--------------------
4. जमिनीचे क्षेत्र :--------------------हेक्टर. --------------आर .
5. तारेची जाळीची मागणी ----------------------------- क्विंटल

मी हमीपत्र लिहून देतो की, श्री -------------------------------------------------रा. ------------------- तालुका ---------------------जिल्हा गडचिरोली येथील रहिवासी शेतकरी असून अर्जात दिल्या प्रमाणे माहिती सत्य असून असत्य आढळल्यास होणाऱ्या कारवाईस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे. मला शेतमालाचे संरक्षणाकारीता ताडपत्रीची आवश्यकता आहे. तरी मला अनुदानावर ताडपत्री घेण्यास पूर्व परवानगी देण्यात यावी. मी स्वखर्चाने ताडपत्री घेण्यास तयार असून त्याचा उपयोग माझे शेतीतील शेतमालाचे संरक्षणा करीता करीन त्याचा दुरुपयोग करणार नाही याची हमी देत आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

शेतकऱ्याची स्वाक्षरी

खालील कागदपत्राची सत्यप्रत जोडावी

1. 7/12
2. नमूना 8
3. आधार कार्ड
4. पास बूक
5. जातीचा प्रमाणपत्र